**मुख्य कार्यालय, विरार**
विरार (प.),
ता.वसई, जि.पालघर - ४०१ ३०३.

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० – २५२५१०७
ई-मेल :vasaivirarcoporation@yahoo.com
जावक क्र: व.वि.श.म./ धा.क्र.०८/ १२६७/२०२५
दिनांक : १२/१२/२०२५

# स्वारस्य अभिव्यक्ती (EOI-EXPRESSION OF INTEREST)

निवेदन.

मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे दाखल सुमोटो याचिका क्र.०५/२०२५ च्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ०७/११/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने राज्यातील सर्व महानगरपालिका / सर्व नगरपरिषदा / सर्व नगरपंचायती यांना देण्यात आल्या निर्देशाचे अनुपालन करणेच्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व सरकारी आणि खाजगी शैक्षणिक संस्था, रुग्णालये (जिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि वैद्यकीय महाविद्यालये यासह), स्टेडियम, बस सार्वजनिक क्रीडा संकुल किंवा बस डेपो आणि रेल्वे स्थानके इत्यादी परिसरात आढळण्याऱ्या प्रत्येक भटक्या श्वानांना ताबडतोब पकडून त्यांचे निर्बीजीकरण आणि लसीकरणानंतर नियुक्त केलेल्या निवाऱ्यांमध्ये हलविण्याची जबाबदारी तसेच अशा भटक्या श्वानांना पुन्हा त्याच ठिकाणी सोडले जाणार नाही, याची दक्षता घेणेकामी मनपाक्षेत्रात भटक्या श्वानांना पकडून त्यासाठी आश्रय / निवाऱ्यांची सोय करणेकरिता वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये स्वतःच्या जागेवर श्वानांसाठी निवारा उभारून सदर ठिकाणी भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया , निर्जंतुकीकरण आणि लसीकरण,सर्व कुत्र्यांसाठी दररोज अन्न आणि पाणी प्रदान करणे,स्वयंपाकघर बांधणे आणि स्वयंपाकी व्यवस्था,आवश्यकतेनुसार कायमस्वरूपी पाळण्यात येणाऱ्या सर्व कुत्र्यांना वैद्यकीय उपचार प्रदान करण्याचे नियोजन असून, भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ यांची मान्यता प्राप्त संस्थाकडून सन २०२५-२६, २०२६-२७ ,२०२७-२८ या तीन आर्थिक वर्षासाठी नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून मनपाक्षेत्रात भटक्या श्वानांना पकडून त्यासाठी आश्रय / निवाऱ्यांची सोय करणेकरिता स्वारस्य अभिव्यक्ती निवेदन मागविण्यात येत आहेत.

(सही/-)
**वसई विरार शहर महानगरपालिका**

AnyScanner

### अ.१) थोडक्यात परिचय

मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे दाखल सुमोटो याचिका क्र.०५/२०२५ च्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ०७/११/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने राज्यातील सर्व महानगरपालिका / सर्व नगरपरिषदा / सर्व नगरपंचायती यांना देण्यात आल्या निर्देशाचे अनुपालन करणेच्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व सरकारी आणि खाजगी शैक्षणिक संस्था, रुग्णालये (जिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि वैद्यकीय महाविद्यालये यासह), स्टेडियम, बस सार्वजनिक क्रीडा संकुल किंवा बस डेपो आणि रेल्वे स्थानके इत्यादी परिसरात आढळण्याऱ्या प्रत्येक भटक्या श्वानांना ताबडतोब पकडून त्यांचे निर्बीजीकरण आणि लसीकरणानंतर नियुक्त केलेल्या निवाऱ्यांमध्ये हलविण्याची जबाबदारी तसेच अशा भटक्या श्वानांना पुन्हा त्याच ठिकाणी सोडले जाणार नाही, याची दक्षता घेणेकामी मनपाक्षेत्रात भटक्या श्वानांना पकडून त्यासाठी आश्रय / निवाऱ्यांची सोय करणेकरिता वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये स्वतःच्या जागेवर श्वानांसाठी निवारा उभारून सदर ठिकाणी भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया , निर्जंतुकीकरण आणि लसीकरण,सर्व कुत्र्यांसाठी दररोज अन्न आणि पाणी प्रदान करणे,स्वयंपाकघर बांधणे आणि स्वयंपाकी व्यवस्था,आवश्यकतेनुसार कायमस्वरूपी पाळण्यात येणाऱ्या सर्व कुत्र्यांना वैद्यकीय उपचार प्रदान करण्याचे नियोजन असून, भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ यांची मान्यता प्राप्त संस्थाकडून सन २०२५-२६, २०२६-२७ ,२०२७-२८ या तीन आर्थिक वर्षासाठी नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून मनपाक्षेत्रात भटक्या श्वानांना पकडून त्यासाठी आश्रय / निवाऱ्यांची सोय करणेकरिता स्वारस्य अभिव्यक्ती निवेदन मागविण्यात येत आहेत.

### अ.२) स्वारस्य अभिव्यक्तीचे उद्दिष्ट

भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ यांच्या प्राप्त मार्गदर्शक सूचनांनुसार एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट (EOI) च्या या आमंत्रणाचा उद्देश आहे.

**(I) Proposed Area for the shelter:**

| Area of Shelter | Number of dogs to be maintained |
|---|---|
| 221 ft x 127 incliuding kennel and facilities. | 1000 dogs |

(ii). Feeding of Dogs within the shelter: That the dogs must be responsibly fed within the shelter, depending on their weight, size and other attributes. The same is stipulated later in this SOP for reference.

(ii). Waste Management: The number of caretakers to be assigned to each shelter as per the requirement for management of waste. The shelter must be cleaned twice every day to avoid spread of infection and better management of waste.

**Proposed Solution**

Handling animals requires skill, experience and understanding of animal behaviour. Most local bodies cannot establish or operate animal shelters or hire trained staff on their own.

- Providing complete services through an **Own–Operate–Manage model**
- Catching dogs from locations indicated by the administration



AnyScanner

- Conducting sterilization surgeries and vaccination for healthy dogs
- Treating sick/injured dogs, followed by sterilization and vaccination
- Housing **all dogs permanently** in shelters
-

**Structure of Dog Shelters**

**Essential Feature**

- Minimum **20 sq.ft space per dog**
- Minimum **200 sq.ft space per group** (pack of dogs)
- Separate sections for intake, quarantine, medical care and socialization
- Keeping dogs in groups to reduce loneliness and mental stress
- Well-ventilated, safe and comfortable kennels
- Compliant with the guidelines of Animal Welfare Board of India.

**Services of the organisation**

- Catching dogs based on complaints received or as directed by the administration
- Providing vehicles, dog catchers, drivers, fuel and other logistics
- Housing captured dogs in kennels according to their groups and arranging the required kennel infrastructure
- Arranging adequate space for kennel facilities
- Constructing shelters outside populated areas, at the ratio of one shelter per 1,000 dogs, so that the city is not troubled by stray dogs
- Performing sterilization and vaccination of all captured dogs; providing required veterinary doctors, medical equipment, surgery facilities and biomedical waste management
- Providing daily food and water for all dogs; constructing a kitchen and arranging cooks and servers
- Providing medical treatment for all permanently housed dogs as and when required
- Appointing caretakers at the ratio of **2 caretakers per 30 dogs**; accordingly, a shelter for 1,000 dogs will have adequate caretakers
- Arranging daily cleaning of all shelters
- Posting 24-hour security/watchmen at shelters
- All such facilities will be arranged by the organisation for every shelter of 1,000 dogs

वरील बाबी लक्षात घेता, माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या भटक्या कुत्र्यांबाबतच्या आदेशांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सदर स्वारस्य अभिव्यक्ती दस्तऐवज मध्ये कामाचे स्वरूप, कामाची व्याप्ती, पात्रता आवश्यकता, प्रपत्रे आणि इच्छुक सहभागींसाठी प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया नमूद करण्यात येत आहे.

निकषांची पूर्तता करणारे अर्ज केवळ मूल्यांकन केले जातील आणि निवड केलेले संस्थांना नियुक्त केले जाईल वसई विरार शहर महानगरपालिका कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही किंवा



AnyScanner

सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवतो, प्रक्रियेचे कोणतेही कारण न देता आणि त्यावर कोणताही दावा / प्रतिदावे स्वीकारले स्वीकारले जाणार नाहीत.

**अ.३) कामाची व्याप्ती**

१. वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये भटक्या श्वानांसाठी निवारा उभारून सदर ठिकाणी भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया, निर्जतुकीकरण आणि लसीकरण,सर्व कुत्र्यांसाठी दररोज अन्न आणि पाणी प्रदान करणे,स्वयंपाकघर बांधणे आणि स्वयंपाकी व्यवस्था,आवश्यकतेनुसार कायमस्वरूपी पाळण्यात येणाऱ्या सर्व कुत्र्यांना वैद्यकीय उपचार प्रदान करणे यासाठी अंदाजे खर्च प्रति श्वान दरमहा रक्कम रु. ----/- एवढा दर निश्चित करण्यात आलेला आहे.

२. वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये भटक्या व मोकाट श्वानांसाठी निवारा केंद्राबाबत भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ (AWBI) ने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक आहे. नियमावलीचे पालन न झाल्यास कायदेशीर प्रश्न उद्भवल्यास त्यास कंत्राटदार स्वत: जबाबदार राहील.

३. नसबंदी ऑपरेशन्सच्या पडताळणीसाठी श्वानांची नसबंदी ऑपरेशन्स नंतर वसई विरार शहर महानगरपालिकेने स्थापित केलेल्या देखरेख व नियंत्रण समिती (Animal Birth Control) द्वारे शस्त्रक्रियेच्या संख्येच्या अवयवांची (वृषण किंवा गर्भाशयाची) तपासणी करून AWBI च्या सुधारित (प्राणी जन्म नियंत्रण नियम २०२२, १० मार्च २०२३ नुसार) सत्यापित केले जाईल.

४. भटक्या व मोकाट श्वानांच्या निवारा केंद्रातील श्वानांच्या नसबंदी शस्त्रक्रिया, औषधोपचार खर्च, अँटीरेबीज लसीकरण करणे, शस्त्रक्रिया पश्चात होणारा खर्च (post-oprative cost) आणि त्यांच्या खाण्याचा खर्च तसेच निर्धारित केलेले सेवकवर्गाच्या वेतनावर होणारा संपूर्ण खर्च, वाहन खर्च, इंधन खर्च, इमारतीचे भाडे, इत्यादि खर्च करण्याची जबबाबदारी नियुक्त होणाऱ्या संस्थेची राहील. या करिता वसई विरार शहर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

५. वेळोवेळी जारी केलेले इतर कोणतेही निर्देश अथवा सूचना ह्या नियुक्त संस्था यांना बांधील राहतील.

**अ. ४) कार्यक्रमांचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| स्वारस्य अभिव्यक्ती चे प्रकाशन | दिनांक / / , सकाळी ११.०० वाजे पासून ते दिनांक / / . दुपारी ३.०० वाजे पर्यंत |
| स्वारस्य अभिव्यक्ती चे कागदपत्र छाननी | / / सकाळी ११.०० वाजता |
| पूर्व पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या स्वारस्य अभिव्यक्तीतील पात्र संस्थेचे सादरीकरण | स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |
| स्वारस्य अभिव्यक्तीतील पात्र संस्थेची निवड व घोषणा | स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |

**अ. ५) निवड पद्धत**

स्वारस्य अभिव्यक्ती द्वारे मागवण्यात आलेले प्रस्ताव यांची छाननी समिती विहित नमुन्यात मागीवलेले कागदपत्रे यांचे मूल्यमापन करून निवड यादी घोषित करण्यात येईल तरी पूर्व पात्रता निकष असणे गरजेचे आहे. सदर निविदा समितीचा निर्णय अंतिम राहील.



AnyScanner

**अ.६) पात्रता निकष**

१) ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाच्या मान्यता प्राप्त संस्थांनी आपले योग्य त्या कागदपत्रासह (AWBI प्रमाणपत्र ) सादर करणे आवश्यक आहे.

२) भारत का राज्यपत्र, मत्स्यपालन,पशुपालन और डेयरी मंत्रालय (पशुपालन एवं डेयरी विभाग) दिनांक १० मार्च २०२३ अधिसुचनेच्या मार्गदर्शन सूचनानुसार सदर प्रकल्पामध्ये भाग घेणाऱ्या संस्थांना किंवा यापूर्वी काम करत असलेल्या संस्थांनी प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या प्रमाणपत्रे, परवानगी तसेच इतर कागदपत्रे वसई विरार शहर महानगरपालिकेस सादर करणे आवश्यक आहे.

३) खाजगी संस्थेने उभारलेले नसबंदी शस्त्रक्रिया केंद्र (नसबंदी शस्त्रक्रिया करणेसाठी उभारण्यात आलेले पिंजरे, जागा) हे ॲनिमल वेल्फेबर बोर्ड ऑफ इंडिया यांच्या निकषाप्रमाणे असणे आवश्यक आहे.

४) स्वयंसेवी संस्था, भारतीय जीव जंतु कल्याण मंडळ (AWBI) कडे श्वान निर्बीजीकरण करण्यास पात्र असावी.

५) एनजीओची नोंदणी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० / बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायदा १९५०, अंतर्गत नोंद असावी.

६) सहभागींना श्वान नसबंदीच्या क्षेत्रात भरीव अनुभव असेल.

७) खाते आणि शिल्लक विवरणासह मागील ३ वर्षांचे प्राप्तिकर विवरण अनिवार्य असेल.

८) सहभागी संस्था यांना नसबंदीच्या ऑपरेशनच्या संख्येच्या आधारे प्राधान्य दिले जाईल.

९) सहभागी भारतात/मूळ देशात काळ्या यादीत टाकलेले नसावे, (हमीपत्र सादर करावे लागेल).

१०) महाराष्ट्र राज्यात श्वान निर्बीजीकरण प्रकल्प राबावल्याचा अनुभव असावा.

११) प्रत्येक दाव्याचे समर्थन अधिकृत कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडून करणे अनिवार्य आहे.

**अ.७) मूल्यमापन निकष**

अर्जदार संस्था ज्यांनी पूर्व पात्रता निकष पूर्ण केले आहेत त्यांचे मुल्यमापन, तांत्रिक मूल्यमापन निविदा समिती द्वारे करण्यात येईल.

**अ.८) गुणपत्रिका**

| मूल्यमापन निकष | कमाल गुण संख्या | मिळालेले गुण |
|---|---|---|
| कुत्र्यांचे प्राणी कल्याण केंद्र / आश्रय चालवण्याचा मध्ये अनुभव (वर्षामध्ये) | २० | |
| गेल्या १० वर्षांत केलेल्या श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रियांची एकूण संख्या | २० | |
| हातात घेतेलेल / पूर्ण झालेल्या श्वान निर्बिजीकरण प्रकल्पांची संख्या | २० | |
| प्राणी जन्म नियंत्रण कार्यक्रमासह इतर प्रकल्प हाती घेणे | १० | |
| सादरीकरण | २० | |
| महाराष्ट्र राज्यात काम केल्याचा अनुभव | १० | |
| एकूण | १०० | |

* निवड होण्यासाठी, सहभागीला किमान ५० गुण मिळणे आवश्यक आहे (अट शिथिल करण्याचे सर्व अधिकार निविदा समिती कडे राहतील).



AnyScanner

**अ.९) तपशीलवार तांत्रिक मूल्यमापन पत्रिका**

| अ. क्र. | मूल्यमापन निकष | एकूण गुण १०० | | |
|---|---|---|---|---|
| | | श्रेणी | कमाल गुण | प्राप्तगुण |
| १ | कुत्र्यांचे प्राणी कल्याण केंद्र / आश्रय चालवण्याचा अनुभव (वर्षांमध्ये) | प्रत्येक वर्षास २ गुण | २० | |
| २ | गेल्या १० वर्षांत केलेल्या श्वान निर्बीजीकरण ऑपरेशन्सची एकूण संख्या | प्रती १०० शस्त्रक्रियासाठी १ गुण | २० | |
| ३ | हातात घेतेलेले अथवा सुरू असलेल्या श्वान निर्बिजीकरण प्रकल्पांची संख्या | महानगर पालिका अंतर्गत प्रकल्पास २ गुण, नगर पालिका अंतर्गत प्रकल्पास १ गुण | २० | |
| ४ | प्राणी जन्म नियंत्रण कार्यक्रमासह इतर प्रकल्प हाती घेणे | रेबीज लसीकरण कार्यक्रम | ५ | |
| | | मोबाईल अम्बुलांस (बाहयउपचार) | ५ | |
| ५ | सादरीकरण - वाहतूक व्यवस्था, शस्त्रक्रिया सामुग्री, शस्त्रक्रिया गृह, श्वान आश्रय व्यवस्था, कार्यकुशल कामगार इत्यादी | सादरीकरणाच्या आधारे मुल्यांकन करण्यात येईल | २० | |
| ६ | महाराष्ट्र राज्यात काम केल्याचा अनुभव | प्रती वर्ष २ गुण | १० | |
| | | एकूण गुण | १०० | |

* 'प्रकल्प'हा महानगरपालिका (वर्ग x,y,z), नगरपालिका, जिल्हा परिषद अंतर्गत एक कंत्राट ह्यास एक प्रकल्प समजण्यात येईल.

**ब) सहभाग घेणाऱ्या संस्थाना सूचना**

**ब.१) स्वाक्षरीदार अधिकृत (AUTHORIZED SIGNATURE)**

EOI स्वायत अभिरुची चे अर्ज सादर करताना सादरकर्ता हा त्या संस्थेचा अधिकृत स्वाक्षरीदार असावा तसेच सर्व दस्तावेज व प्रमाणपत्रे हे अधिकृत स्वाक्षरीदार यानेच प्रमाणित करून पाठवाव्यात. संपूर्ण पत्र व्यवहार हा संस्थे कडून होताना हा अधिकृत स्वाक्षरीदार मार्फत च स्वीकारला जाईल.

**ब.२) स्वारस्य अभिरुची सादर करणे (SUBMISSION OF EOI)**

सदर स्वारस्य अभिरुची वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या संकेत स्थळ https://vvcmc.in वर सदर दस्तावेज उपलब्ध असेल तरी सर्व नमूद केलेले कागदपत्रे प्रपत्र, दस्तावेज, प्रमाणपत्र, शहर महानगरपालिका, मुख्यालय येथे टपालाने, स्वहस्ते सादर करावेत.

**ब.३) स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) सोबत लागणारी कागदपत्रे**

स्वायत अभिरुची (EOI) दाखल करणाऱ्या संस्थांनी खालील प्रमाणे कागदपत्रे जोडावीत

१) अधिकृतता पत्र (Letter of Authorization)
२) प्रपत्र १ प्रस्तावाचा नमुना प्रपत्र
३) प्रपत्र २ पूर्व-पात्रता निकष (Pre-Qualification Criteria)
४) प्रपत्र ३ श्वान निर्बीजीकरण प्रकल्प अनुभवाचा तपशील
५) प्रपत्र ४ सहभागींबद्दल तपशील
६) प्रपत्र ५ प्रतिज्ञापत्र किंवा स्व-घोषणा
७) मूल्यमापन निकषांनुसार अतिरिक्त समर्थन करणारे दस्तऐवजअथवा कागदपत्रे.
८) मागिल तीन वर्षाचे प्राप्तीकर विवरण (ITR Returns), ताळेबंद विवरण (Account And Balance Sheet)



AnyScanner

९) इतर कोणतीही माहिती अर्जदाराला त्यांचे दावे सिद्ध करण्यासाठी सादर करावयाचे असल्यास सोबत जोडावेत.

स्वारस्य अभिरुची चे सर्व दस्तावेज हे घनकचरा व्यवस्थापन विभाग,वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय येथे टपालाने, स्वहस्ते सादर करावेत.

**ब.४) स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मध्येसुधारणा**

स्वारस्य अभिव्यक्ती मध्ये स्वताहून अथवा संस्थे मार्फत काही तृटी निदर्शनास आल्यास सदर स्वारस्य अभिव्यक्ती मध्ये सुधारणा करण्याचे संपूर्ण अधिकार हे वसई विरार शहर महानगरपालिका राखून ठेवीत आहे. तसेच अर्ज सादरकरण्याची शेवटची तारीख बदलण्याची संपूर्ण अधिकार हे अवधित राहतील.

**ब.५) अर्जासाठी प्राथमिक परीक्षा**

१) वसई विरार शहर महानगरपालिका आलेल्या सर्व अर्जाची छाननी करेल.

२) सदर अर्जामध्ये काही त्रुटी असतील पण त्या सदर कार्यक्रम राबिविन्या करिता अति महत्वाच्या बाबी नसल्यास त्या त्रुटी दुर्लक्षित करण्याचे संपूर्ण अधिकार निविदा समितीस राहतील.

३) अर्जादारंचे मुल्यांकन हे उपलब्ध माहिती नुसार केला जाईल. तरी जर अधिक स्पष्टीकरण लागणार असेल तर तसे मागविण्याचे संपूर्ण अधिकार निविदा समिती कडे राहतील.

**ब.६) अर्जाचे मूल्यमापन**

अर्जाच्या मूल्यांकनाची प्रक्रिया खाली दर्शविली आहे.

१) स्वायत अभिरुची (EOI) मध्ये पूर्व-पात्रता निकष निर्दिष्ट केले आहेत त्या प्रमाणे अर्जदाराने प्रस्तावित कागदपत्रे त्याच क्रमाने सादर करावेत.
२) केवळ सहभागी, जे पूर्व पात्रता निकष पूर्ण करतात, त्यांचे नमूद केलेल्या मूल्यमापन निकषांनुसार निवडीसाठी मूल्यांकन केले जाईल.
३) मुल्यमापनात किमान ५० गुण मिळवणाऱ्या सहभागींना शॉर्ट लिस्टिंगसाठी विचारात घेतले जाईल. तसेच सदर अट शिथिल करण्याचे सर्व अधिकार निविदा समितीकडे राहतील.

**ब.७) स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) नाकारणे.**

अर्ज नाकारला जाण्यास खालील कारणाने केले जाईल :
अ) अर्ज विहित नमुन्यात नाही आणि त्यात सर्व आवश्यक तपशील नाहीत.
ब) देय तारीख आणि वेळ संपत्यानंतर प्राप्त होणारे अर्ज
क) स्वायत अभिव्यक्ती (EOI) सोबत योग्य सहाय्यक कागदपत्रे नाहीत.

**ब.८) अस्वीकरण (disclaimer)**

वसई विरार शहर महानगरपालिका कोणत्याही अर्जाच्या उशीरा प्राप्तीसाठी जबाबदार राहणार नाही. उशिरा प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**ब.९) प्रस्तावित अटी व शर्ती पुढील प्रमाणे-**

१. वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये भटक्या श्वानांसाठी निवारा उभारून सदर ठिकाणी भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया , निर्जंतुकीकरण आणि लसीकरण,सर्व कुत्र्यांसाठी दररोज अन्न आणि पाणी प्रदान करणे,स्वयंपाकघर बांधणे आणि स्वयंपाकी व्यवस्था,आवश्यकतेनुसार कायमस्वरूपी पाळण्यात येणाऱ्या सर्व कुत्र्यांना वैद्यकीय उपचार प्रदान



AnyScanner

करणे यासाठी अंदाजे खर्च प्रति श्वान दरमहा रक्कम रु. -------/- एवढा मनपाने निश्चित केलेले दर/बाजार भाव दराने काम करणे बंधनकारक राहील.

३. ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाने निश्चित केलेल्या दरामध्ये बदल झाल्यास सदर प्रकल्पामध्ये पात्र होणाऱ्या संस्थांना त्याच दराने काम करणे बंधनकारक राहील.

१. Animal Birth Control (Dog) चे काम करणाऱ्या सर्व संस्थांनी मनपाने व मॉनिटरिंग कमिटीचे प्रमाणित केलेले मोबाईल App वापरणे बंधनकारक राहील.

२. . वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रियाकरणेसाठी ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक आहे. नियमावलीचे पालन न झाल्यास कायदेशीर प्रश्न उद्भवल्यास मक्तेदार सर्वस्वी जबादार राहील

६. Animal Birth Control (Dog) चे काम करणाऱ्या सर्व संस्थांनी सनियंत्र समितीच्या देखरेखीखाली काम करणे बंधनकारक राहील.

७. भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया, औषधोपचार खर्च अँटी रेबीज लसीकरण करणे तसेच निर्धारित केलेले खर्च, सेवक वर्गाच्या वेतनावर होणारा संपूर्ण खर्च वाहन खर्च, इंधन खर्च करण्याची जबाबदारी नियुक्त होणाऱ्या संस्थेची राहील.याकरिता वसई विरार शहर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

८. शासकीय संस्थाकडून श्वानांना पकडताना चे Geo Tag फोटो हे बंधनकारक आहे.

९. सदर पात्र ठरणाऱ्या संस्थांनी वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये उपयोगात आणणाऱ्या वाहनांना GPS लावणे बंधनकारक आहे.

१०. सदर पात्र ठरणाऱ्या संस्थांनी आरोग्य विभागाने ठरवून दिलेल्या परिमंडळ/झोन/क्षेत्रीय कार्यालये येथील श्वानांना पकडून निवारा केंद्र येथे ठेवावे लागतील.

११. पात्र ठरणाऱ्या संस्थेना वसई विरार शहर महानगरपालिका आवश्यकतेनुसार व नियोजनाप्रमाणे निवारा केंद्राचे काम वाटून देण्यात येईल.

१२. संस्थेच्या कामावर विभागाचे नियंत्रण राहील.

१३. सदर प्रकल्पा मध्ये पात्र ठरणाऱ्या सर्व संस्थाना जागतिक Zoonoses Day (६ जुलै) व जागतिक रेबीज डे (२८ सप्टेंबर) या दिवशी मोकाट व भटक्या श्वानांना मोफत लसीकरण करणे बंधनकारक राहील त्यासाठी वसई वसई विरार महानगरपालिका कोणतेही रक्कम अदा करणार नाही.

१४. सदर संस्था यांना कुठेलेही वीज देयक, पाणी देयक देय राहणार नाही. सदर खर्च नियुक्त संस्थेने करावयाचे आहे.

१५. सहभागी संस्था सुरक्षा ठेव उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शा.नि. दि १/१२/२०१६ मधील मार्गदर्शक सूचना नुसार सुरक्षा ठेव ही देयका मधून कपात करण्यात येईल.

१६. सदर नियुक्त संस्थानी नियोजित लक्षांका प्रमाणे काम न केल्यास सदर करार रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार वसई विरार शहर महानगरपालिका राखून ठेवत आहे व मनपाचा निर्णय हा अंतिम असेल त्याविरुद्ध कोणताही दावा दाखल करता येणार नाही.

१७. वरील अटी व शर्तीचा भंग झाल्यास सदर संस्थेला देण्यात आलेले काम अथवा करण्यात आलेला करारनामा रद्द करण्याचे अथवा काम काढून घेण्याचे अधिकार मा. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना राहतील.

१८. सदर कंत्राट हे वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये संपुर्ण परीसरामध्ये आहे. त्यामुळे निश्चित केलेल्या दरानुसार व वेळोवेळी दिलेल्या सुचने नुसार अनुपालन करण्यात यावे.

१९. सदर योजनेचा प्रागतिक अहवाल दर ३० दिवसांनी सादर करावा, प्रागतिक अहवाल हा शहर महानगरपालिकेने स्थापित केलेल्या देखरेख व नियंत्रण समिती (Animal Birth Control) समोर पारित करूनच सादर करण्यात यावा.

२०. सदर निविदेची निविदा शुल्क रुपये ५१००/-, व ९१८/- रु GST एकूण ६०१८/- रु असेल.



AnyScanner

२१. निविदा उद्योग, ऊर्जा व कामगार विभागा कडिल शासन निर्णय दिनांक १/१२/२०१६ मधील मार्गदर्शक सूचना नुसार अंतिम करण्यात येईल.

२२. प्रस्तुत प्रकरणी प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारण्याचा अथवा रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त, शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

(सही/-)

**वसई विरार शहर महानगरपालिका**

AnyScanner

प्रपत्र १

## स्वारस्य अभिरुचीच्या प्रस्तावाचा नमुना

प्रति,
मा. आयुक्त,
वसई विरार शहर महानगरपालिका.
मुख्यालय, विरार (पु.)

विषय : मा. सर्वोच्च न्यायालय येथील Suo Moto Writ Pet. (Civil) No.५/२०२५ बाबत दि.०७/११/२०२५ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी करणेच्या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात भटक्या श्वानांसाठी निवारा केंद्र बांधणेसाठी स्वारस्य अभिव्यक्ती निवेदन (EOI) मागविणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार, खाली स्वाक्षरी केलेल्यांनी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) संबंधित सर्व दस्तऐवजांचे तपशीलवार वाचन आणि परीक्षण केले आहे तसेच तुमच्या कार्यक्षेत्रात निर्दिष्ट कार्यक्रमासाठी काम करण्यासाठी याद्वारे स्वारस्य व्यक्त करत आहोत.

| अ.क्र. | वर्णन | शेरा |
|---|---|---|
| १ | सहभागी संस्थेचे नाव | |
| २ | पत्ता | |
| ३ | व्यक्तीचे नाव, पद आणि पत्ता (Authorized Signature) | |
| ४ | दूरध्वनी क्रमांक | |
| ५ | मोबाइल क्रमांक (संपर्क व्यक्ती) | |
| ६ | ई - मेल आयडी संस्थेचा | |
| ७ | ई - मेल आयडी (संपर्क प्रमुख) | |

मी/आम्ही खालील प्रमाने कागदपत्रे सोबत जोडले आहेत.

१. अधिकृतता पत्र. (Letter of Authorisation)
२. संस्थेच्या लेटर हेडवर योग्य रित्या सीलबंद आणि अधिकृत व्यक्तीने स्वाक्षरी केलेला अर्ज (प्रपत्र १)
३. पूर्व-पात्रता पात्रता निकष (प्रपत्र २).
४. श्वान निर्बिजीकरण अनुभव (प्रपत्र ३)
५. अर्जदाराबद्दल तपशील (प्रपत्र ४)
६. प्रतिज्ञापत्र/स्व-घोषणा (प्रपत्र ५)
७. आवश्यक कागदपत्रांच्या स्व-प्रमाणित प्रती (Attested Copy Of Supporting Documents).
८. मागील तीन वर्षाचे प्राप्तीकर विवरण (ITR returns), ताळेबंद विवरण (Account And Balance sheet).

मी/आम्ही याद्वारे घोषित करतो की माझा/आमचा स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) सद्भावनेने केला आहे आणि त्यात असलेली माहिती हि खरी आहे.

आपला विश्वासू
सही
पद
शिक्का
दिनांक________स्थळ-__________



AnyScanner

प्रपत्र २

**पूर्व-पात्रता निकष**

| अ.क्र. | विवरण | शेरा |
|---|---|---|
| १ | संस्थेचे AWBI Registration नोंदणी स्थिती / मान्यता – आहे / नाही. | |
| २ | संस्थेत कार्यरत नोदनीकृत पशुवैद्यक (MSVC/VCI) नावे व नोंदणी क्रमांक | |
| ३ | धर्मादाय आयुक्त यांच्याकडील नोंदणी | |
| ४ | श्वान निर्बिजीकरण करण्याचा अनुभव वर्षामध्ये | |
| ५ | श्वान आश्रय / श्वान निवाऱ्यां केंद्राचे रूपरेषा व प्लॅन. | |
| ६ | संस्थेची श्वान आश्रय / श्वान निवाऱ्यां केंद्राची सध्याची क्षमता. | |
| ७ | संस्था कुठल्याही राज्यात काळ्या यादीत नलसल्याबाबत हमीपत्र. | |
| ८ | संस्था MMRDA हद्दीत कार्यरत असल्यास तपशीलवार माहिती. | |

अर्जदाराची स्वाक्षरी



AnyScanner

प्रपत्र ३

## श्वान आश्रय / श्वान निवाऱ्यां केंद्राचे अनुभावाचे तपशील

श्वान निवाऱ्यां केंद्राचे /श्वान निर्बिजीकरण (प्राणी जन्म नियंत्रण उपक्रमातील) अनुभवाचे तपशील आणि पूर्ण झालेल्या / हातात असलेल्या प्रकल्पांची माहिती.

| अ.क्र. | उपक्रम राबिविणाऱ्या स्वायत संस्थेचे नाव ( Name Of Hiring Authority) | स्वायत संस्थेचा पत्ता व संपर्क तपशील | कामाचे स्वरुप | निर्बिजीकरन करण्यात आलेल्या श्वान /निवाऱ्यां केंद्रातील श्वानाची संख्या/ | उपक्रम चालू केल्याची दिनांक | उपक्रम समाप्त केल्याची दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |

अर्जदाराची स्वाक्षरी

टीप:-
कृपया लक्षात घ्या कामावर घेणाऱ्या प्राधिकरणाकडून कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर ) सादर करणे आवश्यक आहे.



AnyScanner

**प्रपत्र ४**

**सहभागी स्वयं सेवी संस्था बद्दल तपशील**

| | |
|---|---|
| स्वयंसेवी सेस्थेचे नाव | |
| कामाचा अनुभव | |
| कार्यालयाची पत्ता | |
| इतर अनुषंगिक माहिती | |
| इतर आवश्यक दस्तावेज<br>१) धर्मादाय आयुक्तां कडे नोंदणी<br>२) AWBI ची मान्यता<br>३) MSVC/VCI नोंदणी प्रमाणपत्रे | |

अर्जदाराची स्वाक्षरी



AnyScanner

प्रपत्र ५

## शपथपत्र किंवा स्व-घोषणा

**संदर्भः स्वारस्य अभिव्यक्ती** - भटक्या श्वानांना पकडून त्यासाठी आश्रय / निवाऱ्यांची सोय करणेकरिता **स्वयं सेवा भावी संस्था (एनजीओ) मार्फत करणे बाबत.**

निवड प्रक्रियेत सहभागी होण्यापासून वगळण्यात येईल जर,

१) संस्था किंवा संस्था चालक दिवाळखोरी झाली असल्यास, अथवा न्यायालीन प्रकरणात कर्ज देणाऱ्या सोबत सामंजस्य / अथवा सेटलमेंट झाली असल्यास.

२) त्यांच्या व्यावसायिक वर्तनाशी संबंधित गुन्ह्यासाठी दोषी ठरविण्यात आले आहे, असे कुठलेही न्यायिक प्रकरण.

३) कोणत्याही मार्गाने सिद्ध झालेल्या गंभीर व्यावसायिक गैरवर्तनासाठी दोषी आहेत, जे करार प्राधिकरण न्याय ठरवू शकते.

४) भ्रष्टाचार, आणि गुन्हेगारी संघटना किंवा इतर कोणत्याही बेकायदेशीर घटकापासून सहभाग समुदायांच्या आर्थिकहित संबंध असल्यास

५) ह्या आधी इतर प्राधिकरणा सोबत करार केल्या नंतर करार पूर्ण न करताच करार मोडला असल्यास.

६) कुठलाही राजकीय दबाव आणल्यास.

तुमच्या स्वारस्याच्या अभिव्यक्तीच्या आव्हानाला प्रतिसाद म्हणून, मी/आम्ही याद्वारे घोषित करतो की:

१) मी/आम्ही मला/आम्हाला वरील पैकी कुठलीही परीस्थिती लागू होत नाही.

२) मी/आम्ही व्यवसायातील सर्वोच्च नैतिक मानकांचे पालन करण्यास सहमत आहोत आणि विशेषतः हितसंबंधांचा कोणताही संभाव्य संघर्ष नाही (CONFLICT OF INTEREST);

३) स्वायत अभिव्यक्ती (EOI) प्रक्रियेदरम्यान किंवा अंमलबजावणी दरम्यान कोणत्याही टप्प्यावर वरीलमध्ये काही बदल आढळल्यास मी/आम्ही प्राधिकरणाला ताबडतोब कळवेन.

४) मी/आम्ही पूर्णपणे ओळखतो आणि स्वीकारतो कि, कोणतीही चुकीची किंवा अपूर्ण माहिती जाणून बुजून दिलेली असल्यास स्वायत अभिव्यक्ती (EOI) अर्ज नाकारण्यात येऊ शकतो.

(अर्जदाराची किंवा संस्थेच्या अधिकृत प्रतिनिधीची स्वाक्षरी स्टॅम्प/सीलसह)



AnyScanner